# कातकरी महिलांनी घेतले पिशव्या निर्मितीचे प्रशिक्षण

**पौड, ता. २९ :** बाणेरच्या रोटरी क्लब व क्विक हिल फाउंडेशन यांच्या वतीने इंदिरा नगरवस्तीतील आदिवासी कातकरी समाजातील महिलांना रद्दी कागदापासून पिशव्या बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. महिलांनी तयार केलेल्या पिशव्यांना रोटरी क्लब बाजारपेठही मिळवून देणार असल्याने कातकरी महिलांच्या कुटुंबाची रोजगारा अभावी होणारी आर्थिक कुचंबणा थांबणार आहे.

बाणेरच्या रोटरी क्लबने पौडची कातकरी वस्ती विकासासाठी दत्तक घेतली आहे. क्लबच्या वतीने विशाखा विचारे यांनी वस्तीतील बारा कुटुंबांतील महिलांना रद्दी कागदापासून पिशव्या बनविण्याचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण दिले. या वेळी अध्यक्ष उन्मेष रिसबूड, सदस्य शशिकांत ठाकूर, नितीन घोडके, पौड बचत गटाच्या प्रेरिका सुरेखा कडू, सविता तोंडे, रूपाली राऊत व कातकरी वस्तीवरील महिला उपस्थित होत्या. प्रशिक्षणाच्या यशस्वितेसाठी सचिन आकरे यांनी विशेष प्रयत्न केले. महिलांनी तयार केलेल्या कागदी पिशव्यांनाही रोटरीमार्फतच बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे रोटेरीयन नितीन घोडके यांनी सांगितले.

क्विक हिलच्या पुढाकाराने येथे 'दिशा' नावाने एक कातकरी विकसन केंद्र सुरू केले गेले असून, यात महिला, मुले, युवक यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात. एकल विद्यालय, कुपोषित मुले व महिलांसाठी पोषण आहार, दर आठवड्याला आरोग्य तपासणी, पाण्याची व्यवस्था, वस्तीलगतच्या रिकाम्या जागेत फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. ही कातकरी वस्ती इतर वस्तीसाठी विकासाचे रोल मॉडेल करण्याचा आमचा मानस आहे, असे क्विक हिलचे सीएसआर प्रमुख अजय शिर्के यांनी सांगितले.



**पौड (ता. मुळशी) : रद्दी कागदापासून पिशव्या बनविण्याचे प्रशिक्षण घेताना आदिवासी कातकरी महिला.**